3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अँण्ड नाष्टा सेंटर
संपूर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४५५ वा • बुधवार, ता. २६ नोव्हेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००



## इथिओपियातील ज्वालामुखी विस्फोटाचा भारतातही परिणाम

**नवी दिल्ली । रयत समाचार**

इथिओपियातील अफार प्रदेशामध्ये स्थित हॅयली गब्बी या ज्वालामुखीचा तब्बल १२ हजार वर्षांनंतर झालेल्या भव्य उद्रेकाचा फटका आता भारतालाही बसू लागला आहे. या ज्वालामुखीतून उसळलेल्या राखेच्या मोठ्या ढगांनी लाल समुद्र ओलांडून यमन, ओमान मार्गे उत्तरी अरब सागर आणि भारताच्या उत्तर भागाकडे मार्गक्रमण केले असून यामुळे हवाई सेवा विस्कळीत झाली आहे. काही आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांनी उड्डाणे पुढे ढकलली किंवा रद्द केली आहेत.

एअर इंडिया आणि इंडिगोने प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे सांगून संभाव्य धोका लक्षात घेऊन आपत्कालीन तयारी ठेवली आहे. ''परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात असून आमचे ऑपरेटिंग क्रू सज्ज आहेत. सध्या आमच्या बहुतांश उड्डाणांवर मोठा परिणाम नाही,'' असे एअर इंडियाने एक्स हँडलवर सांगितले.

इंडिगोने देखील आश्वासन दिले की, ज्वालामुखीची राख पश्चिम भारताच्या दिशेने येत असली तरी प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सर्व आवश्यक खबरदारी घेतली जात आहे. आंतरराष्ट्रीय एव्हिएशन संस्थांशी समन्वय साधून हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे.

दरम्यान, आणि या आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांनी सौदी, कुवैत आणि नेदरलँड्सकडे जाणाऱ्या काही उड्डाणांना तात्पुरती स्थगिती दिली आहे. (नागरी उड्डयन महासंचालनालय) नेही सर्व विमान कंपन्यांना सतर्कतेची सूचना देत संभाव्य पर्यायी मार्गांचे नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत.

तज्ज्ञांच्या मते, वातावरणात पसरलेली ज्वालामुखीय राख विमानांच्या इंजिनसाठी धोकादायक ठरू शकते कारण ती इंजिनमध्ये शिरल्यास जेट इंजिनचे नुकसान होऊ शकते. तसेच दृश्यता कमी झाल्याने विमानवाहतुकीवर परिणाम होऊ शकतो.


प्रवाशांना विमान कंपन्यांच्या अधिकृत वेबसाइट व ग्राहकसेवा केंद्रांद्वारे अद्ययावत माहिती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## ९ भाषांत डिजिटल संविधान आवृत्तीचे प्रकाशन

### संविधान दिन : केंद्रीय सभागृहात राष्ट्रीय कार्यक्रम

**नवी दिल्ली । रयत समाचार**

संविधान दिनानिमित्त आज बुधवार, ता. २६ नोव्हेंबर रोजी जुन्या संसद भवनातील ऐतिहासिक केंद्रीय सभागृहात राष्ट्रीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचे नेतृत्व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू करणार आहेत. २०१५ पासून संविधान दिन साजरा करण्याची परंपरा सुरू झाली असून २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने भारतीय संविधान स्वीकारल्याच्या स्मरणार्थ हा दिवस देशभर पाळला जातो.




संसदीय कामकाज मंत्रालयानुसार, हा कार्यक्रम संविधान सदन म्हणून घोषित जुन्या संसद भवनात होणार आहे. राष्ट्रपती मुर्मू यांच्यासह उपराष्ट्रपती व राज्यसभा सभापती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिरला, केंद्रीय मंत्री आणि खासदार उपस्थित राहणार आहेत. सुरुवातीला सभापती व उपराष्ट्रपती मार्गदर्शन करतील, त्यानंतर राष्ट्रपती मुर्मू प्रमुख भाषण करणार आहेत.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे भारतीय संविधानाच्या नऊ भाषांतील डिजिटल आवृत्त्यांचे प्रकाशन होणार आहे. यामध्ये मराठी, मल्याळम, नेपाळी, पंजाबी, बोडो, काश्मिरी, तेलुगू, ओडिया आणि आसामी या भाषांचा समावेश असून या आवृत्त्या विधी मंत्रालयाच्या विधी विभागाने तयार केल्या आहेत. तसेच मूळ संविधानातील कॅलिग्राफीवर आधारित विशेष स्मरणिका पुस्तिकाही प्रकाशित केली जाणार आहे. राष्ट्रपतींच्या नेतृत्वाखाली संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात येणार आहे.

संविधान दिनानिमित्त देशभरातील केंद्र व राज्य मंत्रालये, अधीनस्थ कार्यालये, राज्य व केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था विविध कार्यक्रमांचे आयोजन करणार आहेत. नागरिक . आणि ७५. या संकेतस्थळांद्वारे ऑनलाइन प्रास्ताविक वाचनात सहभागी होणार आहेत.

''हमारा संविधान हमारा स्वाभिमान'' या विषयावर राष्ट्रीय पातळीवरील क्विझ, ब्लॉग आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच पंचायत स्तरापासून संसद भवनापर्यंत परिषद, चर्चासत्रे, लघुपट, प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम, पोस्टर आणि रंगोली स्पर्धा अशा विविध उपक्रमांनी संविधान दिन उत्साहात साजरा होणार आहे. राष्ट्रव्यापी उपक्रमांमुळे संविधानाच्या मूल्यांची जागरूकता अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा आहे.

## अनुराधा मिश्रा यांचा भूतानमध्ये डंका

### आशियाई पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत ३५० किलो वजन गटात दोन सुवर्ण



**अहमदनगर । रयत समाचार**

अनुराधा रत्नेश मिश्रा यांनी भूतानमध्ये झालेल्या आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत ऐतिहासिक कामगिरी केली. महिलांच्या विभागात तब्बल ३५० किलो वजन उचलत त्यांनी विक्रमी प्रदर्शनासह दोन सुवर्णपदके पटकावली. संयुक्त भारतीय खेळ फाऊंडेशन (इंडू श्री ऑर्गनायझेशन) यांच्या वतीने ही मुक्त स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

भूतानची राजधानी थिंपू येथे पार पडलेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आशिया खंडातील अनेक नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतला. प्रचंड स्पर्धात्मक वातावरणात अनुराधा मिश्रा यांनी केलेली जोरदार कामगिरी भारतीय संघासाठी अभिमानास्पद ठरली. त्यांनी महिलांच्या सिनियर गटात आणि मास्टर गटात प्रत्येकी एक सुवर्णपदक जिंकत दुहेरी सुवर्णाची कमाई केली.

अत्यंत काट्याच्या स्पर्धेत ३५० किलोपर्यंत वजन उचलत त्यांनी तांत्रिक कौशल्य, ताकद आणि विलक्षण संतुलनाची उत्तम प्रात्यक्षिके सादर केली. त्यांच्या या ऐतिहासिक यशामुळे जागतिक चॅम्पियनशिपसाठी त्यांची निवड निश्चित झाली असून ही शहरासाठी आणखी एक अभिमानाची बाब आहे.

या कामगिरीमागे महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग संघटनेचे अध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कार विजेते तुषार दारकर, सचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे, तसेच राष्ट्रीय पंच निशा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. अनुराधा मिश्रा या सावेडी येथील जिम स्ट्राईकरमध्ये प्रशिक्षक स्वप्निल मंडलिक यांच्या देखरेखीखाली सराव करतात. कठोर परिश्रम आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणाच्या जोरावर त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर शहराचा झेंडा अभिमानाने उंचावला आहे.

अनुराधा मिश्रा यांना यापूर्वीही ''स्ट्राँग वुमन ऑफ महाराष्ट्र'' हा किताब मिळाला असून त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बहुभाषिक कवी संमेलनात आदर्श परिसर, आदर्श समाजाचा संदेश

### कोंकणी शांती प्रकाशन आयोजित काव्य मेळावा




**पणजी । प्रभाकर ढगे**

कोंकणी शांती प्रकाशन (KSP) यांच्या वतीने ता. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी मिरामार येथील CSPH कॅम्पसवर ''आदर्श परिसर, आदर्श समाज'' या विषयावर बहुभाषिक कवी संमेलन उत्साहात पार पडले. मराठी, कोकणी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी भाषांतील कवींनी सहभाग नोंदवून गोव्यातील समृद्ध सांस्कृतिक विविधतेचे सुंदर दर्शन घडवले. कवितांमधून परिसरातील मानवी नातेसंबंध, सहजीवन, सामाजिक सौहार्द आणि बदलत्या मूल्यांचे जिवंत चित्र उभे राहिले

कवींनी समाजातील विविध पैलूंवर भाष्य करताना शेजाऱ्यांमधील वाढती दुरावलेली भावना, गैरसमज, सामाजिक तणाव, ध्रुवीकरण आणि मानवी नात्यांतील भावनिक अंतर याकडे लक्ष वेधले. काही कवींनी पूर्वीच्या सामायिक जीवनशैलीची उबदारता, सहवास आणि सांस्कृतिक सलोखा यांची आठवण करून देत सामाजिक बांधिलकीची गरज अधोरेखित केली. ''या वाढत्या दुराव्याचे वेळेत निराकरण झाले नाही तर त्याचे गंभीर परिणाम समाजावर होतील,'' असा इशाराही अनेक कवितांतून व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे पाहुणे प्रसिद्ध कवी अभय सुराणा व कोंकणी शांती प्रकाशनाचे उपाध्यक्ष अब्दुल वाहीद खान होते. अभय सुराणा यांनी भूतकाळापासून आजच्या समाजापर्यंतच्या बदलत्या प्रवाहांवर आधारित त्यांच्या कवितांचे सादरीकरण केले.

अध्यक्षीय भाषणात अब्दुल वाहीद खान यांनी औद्योगिक क्रांतीनंतर वाढलेल्या भौतिकवाद, करिअरकेंद्री जीवनशैली आणि व्यक्तिवादामुळे समाजातील परंपरा, नीतिमत्ता आणि कौटुंबिक मूल्यांवर झालेले परिणाम अधोरेखित केले. त्यांनी नमूद केले की ''संपत्ती, प्रतिष्ठा आणि सत्तेच्या मागे लागलेल्या जीवनात 'परलोकातील जबाबदारी' हा सर्वधर्मीय तत्त्वज्ञानाचा मूलभूत भाव मागे पडतो आहे.'' मानवतेची सेवा आणि इतरांच्या कल्याणासाठी वेळ देणे हीच मूल्यव्यवस्थेची पुनर्स्थापना करण्याची खरी गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

संमेलनात डॉ. पवित्रा देशप्रभू, सुनीता पेडणेकर, सोनाली पेडणेकर, सय्यदा आफिफा कादरी, शर्मीन देशमुख, महेश पारकर, नीलबा ए. खांडेकर, फहाद हाश्मी, सुरेखा खेडेकर, उद्धव पोळ, मोहिनी हलर्णकर, सय्यदा नाझमीन, वर्षा प्रभुगावकर, सलमा मकानदार, झोया खान पठाण आणि अनघा कामत यांनी काव्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चित्रा क्षीरसागर आणि जावेद कुरेशी यांनी केले. संपूर्ण संमेलनात बहुभाषिक काव्य, सामाजिक संदेश आणि सांस्कृतिक ऐक्याची भावना प्रभावीपणे रंगून गेली.

## नवीन 'कामगार विरोधी' संहिता

**समाजसंवाद । संजीव चांदोरकर**

निवडणूक जिंकण्याचा फॉर्म्युला महाराष्ट्रात टेस्ट केला गेला. बिहारमध्ये त्यावर शिक्कामोर्तब झाले. त्यातून राजकीय आत्मविश्वास वाढलेल्या केंद्र सरकारने, गेली पाच वर्षे आणणार, आणणार म्हणून सांगितलेल्या वेतन, औद्योगिक सबंध, सामाजिक सुरक्षा आणि कामाच्या ठिकाणची परिस्थिती यांना नियमित करणाऱ्या चार स्वतंत्र कामगार संहिता तातडीने लागू केल्या आहेत.

कोणत्याही सत्ताधाऱ्यांना परत परत निवडून यायचे असते. साहजिकच आपल्या मोठ्या, देशभर फूटप्रिंट असणाऱ्या, राजकीयदृष्ट्या संवेदनशील निर्णयाचे आपल्या भविष्यातील निवडून येण्यावर विपरीत परिणाम होऊ द्यायचे नसतात.

म्हणूनच या संहिता कामगार हिताच्याच कशा आहेत अशी प्रतिपादने, बातम्या, पानभर जाहिरातीमधून लोकांसमोर मांडल्या जात आहेत.

**या चार कामगार संहितांचा परिणाम दोन पक्षांवर होणार आहे :** कॉर्पोरेटवर / एम्प्लॉयर/ नोकरी देणाऱ्यांवर वर आणि कामगारांवर/ नोकरी करणाऱ्यांवर

केंद्र सरकार उच्च स्वरात काहीही म्हणो. हा परिणाम विषम असणार आहे. दुसरे म्हणजे या दोन पक्षांच्या सामर्थ्यात जमीन अस्मानाचा फरक आहे. बघूया.

**कंपन्या/ एम्प्लॉयर/ नोकरी देणारे :**

कंपन्या त्यातील तरतुदींचा फायदा उठवत आपल्या कामगार विषयक धोरणात धडाधड बदल करणार आहेत. उदा. कायमची नोकरी हा प्रकार नसेल, कोणालाही कामावरून काढता येणार, ३०० पेक्षा कमी कामगार असतील तर कंपनी बंद करण्यासाठी शासनाची पूर्व परवानगी घेण्याची गरज नसणार, इत्यादी

**कामगार/ नोकरी करणारे :**

संहितांमध्ये कामगारांच्या हिताच्या ज्या गोष्टी सांगितल्या जात आहेत ते सर्व शब्दांचे गुच्छ आहेत. . हे राजकीय अर्थव्यवस्थेचे ट्रेड सिक्रेट आहे. म्हणजे नेहमीच असते. काही उदाहरणे.

**प्रत्येक कामगाराला नियुक्ती पत्र दिले जाईल :**

ज्या कामगाराला ते दिले जाणार नाही त्याने समजा आग्रह धरला तर त्याला सांगितले जाईल काम करायचे तर कर, नाहीतर दुसरा गेटबाहेर उभा आहे. तो कामगार नियुक्ती पत्राचा आग्रहच सोडून देईल ना ?

**किमान वेतन दिले जाईल :**

किती? कोण ठरवणार? ते महागाई प्रमाणे वाढेल का ? इथे कागदोपत्री आणि प्रत्यक्ष मिळालेले वेतन यात सर्रास तफावत असते.

**ट्रेड युनियन :**

ताकदवान कंपनी व्यवस्थापनासमोर एक सुटा कामगार म्हणजे महाकाय गवत कापणाऱ्या स्वयंचलित मशीनसमोर एक गवताचे पाते. खटकन कापले जाणार. सामुदायिक ट्रेड युनियन असेल तरच एकट्या कामगाराचा थोडाबहुत निभाव लागतो. इथे तर एका एका कामगाराबरोबर स्वतंत्र एम्प्लॉयमेंट करार करण्याची पद्धत रुजत आहे. कसली ट्रेंड युनियन आणि काय. आता तर ट्रेड युनियनची मान्यता क्षुल्लक कारणांमुळे रद्द केली जाणार आहे.

या आधी कामगारांच्या कल्याणासाठी केलेल्या योजनाचे काय भजे झाले त्याची माहिती कोणीही देत नाही. दोनच उदाहरणे

(अ) बांधकाम मजुरात जायबंदी होण्याचे प्रमाण मोठे आहे. त्यांच्यासाठी सेस फंड स्थापन करून त्यांना मदत करण्याचा प्रस्ताव वीस वर्षापूर्वी मंजूर झाला. त्याचे काय झाले?

(ब) गिग वर्कर्स साठी ई-श्रम पोर्टल सुरू केले होते. देशात एक कोटी गिग वर्कर्स आहेत. एक रिपोर्टप्रमाणे पाच वर्षात फक्त पाच टक्के गिग वर्कर्सची नोंदणी झाली आहे.

आम्ही चांगल्या, कल्याणकारी योजना बनवतो. त्यातून ज्यांना लाभ होणार आहे त्यांनी हालचाल केली नाही तर दोष कोणाचा. हीच उत्तरे असणार आहेत प्रस्थापित व्यवस्थेची. अनेक दशके हीच उत्तरे दिली जात आहेत.

**लहान मुले स्वतःचे संरक्षण स्वतः करू शकत नाहीत म्हणून तर आईवडील त्यांचे संरक्षण करतात. मायबाप सरकार या संकल्पनेमागे हे तत्व आहे.** शासन म्हणते आम्ही जनतेचे मायबाप नाही. बाकी डिटेल्स दुय्यम आहेत. त्यात भर म्हणजे कामगारवर्गाची ट्रेड युनियनची, आधीच फाटलेली उरली सुरली कवच कुंडले काढून घेण्यात येणार आहेत.

## मतदार नोंदणी सुधारणा थांबवा, नाहीतर केंद्र सरकार हटवा- बॅनर्जी



**कोलकाता । रयत समाचार**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मतदार यादीतील Special Intensive Revision (SIR) प्रक्रियेवर तीव्र नाराजी व्यक्त करत केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर थेट हल्ला चढवला. बंगावन येथे आयोजित विरोधी सभेत त्यांनी मतदारांच्या नावांवर सुरू असलेल्या हटविण्याच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित केले. त्या म्हणाल्या, आपलं नाव मतदार यादीतून काढलं तर मग केंद्र सरकारही डिलीट करा! भाषा आणि संस्कृतीच्या आधारे त्यांनी बांगलादेशाबद्दल आपली आत्मीयता व्यक्त करत सांगितले, मी बिरभूमची आहे, पण उद्या ते मला पण बांगलादेशी म्हणतील. भाषा एक असणं हे देशद्रोह नाही.'' ममतांनी दावा केला की, SIR ची प्रक्रिया घाईघाईत २०२६ विधानसभा निवडणुकीच्या आधी करून मतदारांवर परिणाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांनी निवडणूक आयोगावर पक्षपातीपणाचा आरोप करत म्हटलं, EC आता BJP आयोग झाला आहे. निष्पक्षता राहिली नाही. त्यांनी पुढे विचारले, SIR जर फक्त बांगलादेशी मतदार हटवण्यासाठी असेल तर मग मध्य प्रदेश, यूपीसारख्या BJP-शासित राज्यांत का चालतेय? ममतांनी सूचित केले की, SIR जर दोन-तीन वर्षांच्या कालावधीत योग्य प्रकारे केली, तर आम्ही सहकार्य करू. निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे की ची अंतिम मतदार यादी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे. सध्या हे काम १२ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू आहे.

## चीनच्या खनिज नियंत्रणावर युरोपची कडक टीका

**ब्रुसेल्स, बेल्जियम । प्रतिनिधी**

युरोपियन युनियनने चीनवर दुर्मिळ खनिजांवर एकाधिकार नियंत्रण ठेवत उद्योगक्षेत्र व युरोपच्या रणनीतिक सुरक्षेला धोका निर्माण केल्याचा गंभीर आरोप केला आहे. इलेक्ट्रिक वाहनं, वारा ऊर्जा टर्बाइन, मोबाईल तंत्रज्ञान आणि संरक्षण यंत्रणांसाठी आवश्यक असलेल्या या खनिजांच्या निर्यातीवर चीनने निर्बंध आणल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी धोक्यात येऊ शकते, अशी ची चिंता आहे.

युरोपियन आयोगाचे उपाध्यक्ष स्टेफन सेजॉर्न यांनी संसदेतील भाषणात सांगितले की, चीनचे निर्बंध हे केवळ व्यापारी नियंत्रण नसून ''रॅकेट'' असून त्याचा थेट परिणाम युरोपच्या सामरिक स्वावलंबनावर होतो. त्यांनी युरोपला चीनवरील अवलंबित्व कमी करण्याचे आवाहन केले.

जागतिक पातळीवरील ७० टक्क्यांहून अधिक दुर्मिळ खनिजांचा पुरवठा चीनकडून होतो. यामुळे युरोप, अमेरिका आणि इतर देश या खनिजांसाठी चीनवर अवलंबून आहेत. युरोपियन युनियनने आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि लॅटिन अमेरिकन देशांबरोबर खनिज करार करण्याचा निर्णय घेतला असून, युरोपमधील खनिज प्रक्रिया क्षमता वाढवण्याची योजनाही जाहीर केली आहे.

इलेक्ट्रिक गाड्या, क्षेपणास्त्रे, फायटर जेट, स्मार्टफोन आणि ५ तंत्रज्ञानासाठी या खनिजांची मोठ्या प्रमाणावर गरज असते. त्यामुळे चीनकडून पुरवठा थांबल्यास युरोपच्या संरक्षण, तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असे अधिकाऱ्यांचे मत आहे.

# चक्क मनपाने बुजविला नैसर्गिक वाहता ओढा

## जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या दुर्लक्षामुळे जलस्त्रोतांना धोका ?




**अहमदनगर । भैरवनाथ वाकळे**

अहिल्यानगर महानगरपालिकेचा नविन प्रताप नुकताच उघड झाला आहे. कराचीवालानगर उत्तरेकडील बाजूस असलेले अ‍ॅड. प्रसन्न जोशी यांच्या बंगल्यासमोरच्या बाजूला असलेला नैसर्गिक वाहता नाला चक्क मनपाने सिमेंट काँक्रीटचे छोटे गटार करत बुजवून टाकल्याचे निर्दशनास आले आहे. आमचे प्रतिनिधी तिथे गेले असता हा प्रकार सुरू असल्याचे दिसले.

अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे शहरात दूर्लक्ष झाल्याने असे गंभीर प्रकार घडत आहेत. सर्व वॉटरबॉडीच म्हणजेच जलस्त्रोत हे महाराष्ट्र शासनाच्या नावे व मालकीचे असतात, त्याचे ७/१२ उतारेसुध्दा शासनाच्या नावे असतात. त्याची देखभाल करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर असते. शहरातील अनेक नैसर्गिक वाहते ओढेनाले या दूर्लक्षामुळे गायब झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या पलीकडून लष्कराच्या एरियातून वहात येणारा नैसर्गिक वाहता ओढा आहे. हा ओढा औरंगाबादरोड पाण्याची टाकी, जुने आरटीओ ऑफिस, राधाबाई काळे महिला महाविद्यालय असा वहात अ‍ॅड. प्रसन्न जोशी यांच्या बंगल्यासमोरून रामवाडी, जिल्हापरिषद निवासस्थाने, पोलिस हेडक्कार्टर, न्यू आर्टस् कॉलेज, बालिकाश्रमशाळा, बागरोजा ते थेट नालेगाव करत सिनानदीला जावून मिळतो. हा नाला अनेक ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर दिसत असून काही ठिकाणी छोटी सिमेंट काँक्रीट गटार करून बेपत्ता करण्याचे षडयंत्र सुरू आहे. यातीलच कराचीवालानगरमधील हा प्रकार सुरू आहे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी व्यक्तिश: लक्ष घालून शहरातील म्हणजेच महानगरपालिका हद्दीतील जलस्त्रोतांचे संरक्षण, जतन केले पाहिजे. संबंधित सिमेंट काँक्रीट गटार रद्द करून ओढा नैसर्गिक वाहता केला पाहिजे.

# शहरात बिबटची तीन पिल्ले

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर शहरालगतच्या ढवण वस्ती येथील कचरा डेपो परिसरात तीन बिबट्याची पिल्ले आढळून आल्याची काल ता. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी धक्कादायक घटना समोर आली. गेल्या काही दिवसांपासून या परिसरात बिबट्या दिसल्याची चर्चा होती. मात्र त्यावेळी वनविभागाने हा दावा नाकारत ''बिबट्या नसून ती केवळ अफवा आहे'' असा खुलासा केला होता.


आज प्रत्यक्ष बिबट्याची तीन पिल्ले सापडताच नागरिकांत भीती पसरली आहे. तसेच वनविभागाने वास्तविक परिस्थिती लपवली का? आणि परिसरातील नागरिकांची सुरक्षा धोक्यात का टाकली? असा संतप्त सवाल स्थानिकांनी उपस्थित केला आहे.

पिल्ले आढळल्यानंतर वनविभागाचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवळील वस्त्या, गटारे आणि झुडपी भागात शोधमोहीम सुरू करण्यात आली. बिबट्याची आई आसपासच असण्याची शक्यता वर्तवली जात असून नागरिकांना अनावश्यक हालचाल टाळण्याचे आवाहन करण्यात आले.

# मनपा ठेकेदाराकडून अहिल्यादेवींच्या नावाला केराची टोपली?

## अहमदनगर नावाने जोरदार वसूली सुरू!

**अहमदनगर । दिपक शिरसाठ**


अकौंट कोड नं.४१ नियम ७३ (१) फेअर प्रिंटर्स १००० बुके १-६-२०२४
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर
नं.
पावती
महानगरपालिका हद्दीमध्ये महापालिका जागेवर व्यवसायाकरीता रस्ता मांडणी फी
इसमाचे नांव
जागा फूट 5 x 4 फूट = चौ.फूट
रक्कम रु. /- फक्त
दिनांक 25/11/2025
वसुली करणाराची सही

तात्कालिन आयुक्त तथा प्रशासक डॉ. पंकज जावळे यांच्याकडून राज्य शासनाने ठराव करून घेत जिल्ह्याचे नामांतर अहिल्यानगर तर मनपाचे अहिल्यानगर महानगरपालिका केले. मनपाचे नामकरण अहिल्यानगर होऊन अनेक महिने उलटले असले तरी, अहिल्याबाई होळकर यांच्या नावाला महानगरपालिकेने मात्र केराची टोपली दाखवल्याचे चित्र सध्या दिसत आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी नुकताच रस्ताबाजू शुल्क आकारणीसाठी ठेकेदार नियुक्त केला. मात्र हा ठेकेदार आजही अहमदनगर याच नावाने पावत्या वाटून वसुली करत आहे. कालपासून ही वसुली सुरू झाली आहे. मात्र, नागरिकांना देण्यात येणाऱ्या पावत्यांवर अहमदनगर महानगरपालिका हेच नाव दिसत आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये चर्चा सुरू असून, ''नामांतर केवळ कागदोपत्रीच झाले काय?'' अशी भावना शहरवासीयांकडून व्यक्त होत आहे. मनपाच्या या उदासीन धोरणामुळे शहरात संतापाचे वातावरण आहे. केवळ नावाचा वापर न करणे इतकाच प्रश्न नाही, तर अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रिय वारशाचाही मनपाला विसर पडला आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. गोरगरीबांच्या मदतीसाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी त्यांच्या काळात कधीही असहाय्य आणि कष्टकरी वर्गावर अन्याय होईल अशी जुलमी वसुली केली नाही. त्यांनी व्यापाऱ्यांवरील अवाजवी कर रद्द केले, छोट्या विक्रेत्यांचे संरक्षण केले, तसेच मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि पायाभूत सुविधा करमुक्त ठेवून उभारल्या. संकटाच्या काळात दानधर्म व मदत केली. या उलट, अहिल्याबाईंच्या न्यायप्रिय परंपरेच्या शहरात आज गोरगरीब विक्रेत्यांकडून दररोज जुलमी पद्धतीने वसुली करण्यात येत आहे. मनपाचे हे कृत्य अहिल्याबाई होळकर यांच्या तत्त्वज्ञानाशी विसंगत आहे.एकीकडे नामांतराचा अध्यादेश काढला जातो, पण प्रत्यक्षात मनपाच्या दैनंदिन व्यवहारात जुन्याच नावाचा वापर सुरू आहे. दुसरीकडे, अहिल्याबाई होळकर यांचा सामाजिक न्यायाचा वारसा सोडून कष्टकरी वर्गाला त्रास देणारी जुलमी वसुली सुरू आहे. यावरून अहिल्यानगर मनपाला अहिल्याबाई होळकर यांच्या वारशाचा विसर पडला आहे काय? असा थेट सवाल शहरातील नागरिकांकडून विचारला जात आहे. मनपाने गोरगरीब विक्रेत्यांवरील जुलमी वसुली थांबवावी, अशी मागणी शहरात जोर धरू लागली आहे.

# काझी यांनी समाजाची दिशाभूल करू नये- तांबटकर

**अहमदनगर । आबीद खान**



नागोरी मुस्लिम मिसगर जमात ट्रस्ट (१७) संदर्भात रेहान काझी आणि इतर काही व्यक्ती दिशाभूल करणारी वक्तव्ये करून समाजाची फसवणूक करत आहेत, असा आरोप जमात ट्रस्टचे युनुस तांबटकर यांनी केला. त्यांनी सांगितले की, ''आम्ही सध्या उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या आदेशानुसार ट्रस्टचे नियमित आजतागायत कामकाज करत आहोत.'

युनुस तांबटकर यांनी स्पष्ट केले की सावन मोबाईल विरुद्ध ... ५४३/२०२५ असा दावा दाखल असून संबंधित व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्याची परवानगी नाही. उलट, संबंधित इमारत महानगरपालिकेने धोकादायक इमारत म्हणून जाहीर केलेली आहे. तरीही रेहान शफी काझी लोकांची दिशाभूल करत असल्याने त्यांच्यावर कोणीही विश्वास ठेवू नये, असेही त्यांनी सांगितले.

ट्रस्टचे सर्व आर्थिक व्यवहार चेकनेच केले जातात, रोखीचा व्यवहार केला जात नाही, असेही तांबटकर यांनी स्पष्ट केले. ''अशा परिस्थितीत रेहान काझी यांनी ट्रस्ट कार्यालयात पैसे जमा करण्यास सांगितले आणि खोटी माहिती पसरवली,'' असा आरोप त्यांनी केला. तसेच, रेहान शफी काझी यांना कोणताही कायदेशीर अधिकार नसताना, त्यांनी बेकायदेशीररीत्या ट्रस्टच्या जागेतील वर्गखोल्या व शाळेच्या कार्यालयाचे कुलूप तोडून स्वतःला विश्वस्त असल्याचा भास निर्माण केला. या बोगस कृत्यांमुळे संबंधित व्यक्तींवर गुन्हे दाखल झाल्याचे तांबटकर यांनी सांगितले. याशिवाय, रोखी व्यवहाराबाबत धर्मदाय आयुक्त, अहमदनगर यांनी अर्ज क्रमांक ६१/२०२३ नुसार चौकशीचे आदेश दिले आहेत. ''ट्रस्टचे सर्व व्यवहार चेकद्वारे पार पडतात. कोणताही रोख व्यवहार केला जात नाही. तरीही रेहान काझी यांनी ट्रस्ट, कॉलेज आणि एमइंग्लिश विभागाशी संबंधित लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असून, तो लपविण्यासाठी सभासद आणि भाडेकरूंमध्ये दिशाभूल करणाऱ्या बातम्या पसरवत आहेत,'' असा गंभीर आरोपही युनुस तांबटकर यांनी केला.

# डॉ. सुजय विखे यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा

## भाजप मध्यमंडळाचा हरित उपक्रम

**अहमदनगर । राहुल जाधव**



भाजपा नेते आणि लोकप्रिय माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे यांच्या वाढदिवसानिमित्त इतर खर्चाला फाटा देत वृक्षारोपण करून अभिष्टचिंतन सोहळा साजरा करण्यात आला. शहरातील 'सिद्धीबाग' येथे महिलाभगिनींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत अहिल्यानगर सतत हरीत राहावे, या संकल्पनेतून कलमी आंबा या फळझाडाची लागवड करण्यात आली.

मध्यमंडळाच्या महिला पदाधिकारी सोनाली पाठक, हर्षदा पवार, हौसाबाई गोंधळे, आरती सकट, प्रिशा साळवे यांच्या हस्ते वृक्षारोपण पार पडले. यावेळी मध्यमंडळ अध्यक्ष सुनील सकट, शालेय शिक्षक राहुल जाधव, माजी मध्यमंडळ अध्यक्ष अशोक भोसले, संतोष सिरसाट, लखन साळवे, गौरव पाचबैल, संतोष साळवे, श्लोक पवार आदी मान्यवर उपस्थित होते. वृक्षारोपणाचा उपक्रम अशोक भोसले आणि सुनील सकट यांच्या पुढाकाराने घेण्यात आला. डॉ. सुजय विखे यांचे जनसेवा आणि विकासातील योगदान अधोरेखित करत उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, सुजयदादा हे नेहमीच पक्षवाढीसाठी, शिक्षण व आरोग्य सेवांच्या विस्तारासाठी आणि सामाजिक एकोप्यासाठी कार्यरत असतात. त्यांच्या कुटुंबाने ग्रामीण भागात अभियांत्रिकी, व्यवस्थापन व विविध महाविद्यालये स्थापन करून तांत्रिक आणि वैद्यकीय शिक्षणाच्या प्रसारात मोठे योगदान दिले आहे. तसेच 'जनसेवा युवा मंच'च्या माध्यमातून जिल्ह्यात विकास आणि सामाजिक सलोखा वाढविण्यासाठी सातत्याने कार्य सुरू आहे. अहिल्यानगरचा सर्वांगीण विकास हेच त्यांचे ध्येय असल्याचेही मान्यवरांनी नमूद केले. ''अशा बहुआयामी आणि समाजासाठी दिशादर्शक असणाऱ्या व्यक्तीचा जन्मदिवस वृक्षारोपणासारख्या उपक्रमातून साजरा करणे हेच खरे अभिष्टचिंतन,'' असे प्रतिपादन मध्यमंडळ अध्यक्ष सुनील सकट यांनी केले.

### २६-२७ नोव्हेंबरला जात प्रमाणपत्र त्रुटी पूर्तता मोहीम

**अहमदनगर । रयत समाचार**

संविधान दिनानिमित्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे २६ व २७ नोव्हेंबर रोजी त्रुटी-पूर्तता विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अर्जदारांना थेट समिती कार्यालयात येऊन प्रलंबित त्रुटी तत्काळ पूर्ण करण्याची संधी देण्यात आली आहे. समितीचे अध्यक्ष रेश्मा माळी यांच्या माहितीनुसार CCVID-II प्रणालीद्वारे ही मोहीम राबविण्यात येत आहे.

# देशाच्या प्रगतीत बँकांचे धोरण महत्त्वाचे : पारगावकर

**अहमदनगर । समीर मन्यार**



कोणत्याही देशाच्या प्रगतीमध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास अत्यंत महत्त्वाचा असतो. या विकासासाठी मनी, मटेरियल, मशीन आणि मॅनपॉवर या चार घटकांची आवश्यकता असते. देश महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना औद्योगिक प्रगतीबरोबरच बँकांचे धोरणही तितकेच महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अहिल्यानगर प्रमुख इंजि. अरविंद पारगावकर यांनी केले.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने एमएसएमई आणि उद्यमिता जनजागृती उपक्रमांतर्गत आयोजित उद्योजकांचा मेळावा एमआयडीसी येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात उत्साहात पार पडला. बँकेचे संस्थापक सर सोराबजी पोचखानवाला यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारगावकर होते.

यावेळी व्यासपीठावर बँकेचे क्षेत्रीय प्रबंधक राजीव नयन, उद्योजक संजय पाटील, इंजि. पिंपरकर, चंदन मंगलम, गुलजनान गौहर आदी मान्यवर उपस्थित होते.

क्षेत्रीय प्रबंधक राजीव नयन म्हणाले की, केंद्र सरकारने लहान आणि मध्यम उद्योजकांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले असून, बँका कर्ज देण्यासाठी सदैव तत्पर आहेत. ''उद्योजकांनी बँकेच्या विविध कर्ज योजनांविषयी माहिती घेऊन आपला व्यवसाय वाढवावा, यासाठीच हा मेळावा आयोजित केला आहे,'' असे त्यांनी सांगितले. उद्योजकांच्या गरजेनुसार विविध कर्ज योजना तयार केल्या असून, कोणताही उद्योजक योजनांपासून वंचित राहणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. पूर्वीच्या ग्राहकांसाठी 'घर वापसी' योजनेंतर्गत प्रक्रिया शुल्क माफ करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

यानंतर संजय भोर यांनी बँकेच्या बिल्डर्स, पीएम स्वनिधी, हॉटेल व्यवसाय, मुद्रा योजना, कंत्राटदारांसाठी विशेष योजना, व्यावसायिक वाहन कर्ज यांसह इतर कर्ज योजनांची सविस्तर माहिती दिली तसेच आवश्यक कागदपत्रांविषयी मार्गदर्शन केले. मातोश्री उद्योग समूहाचे अध्यक्ष प्रभाकर पुंडे यांनी शेतकरी कुटुंबातून उद्योजक होण्यापर्यंतचा प्रवास सांगताना, विविध टप्प्यांवर बँकेकडून मिळालेल्या कर्जाच्या मदतीमुळे व्यवसाय उभारणी शक्य झाल्याचे सांगितले.

याप्रसंगी बँकेच्या विविध शाखांमधून मंजूर झालेल्या कर्ज प्रस्तावानुसार गृहिणी, सुशिक्षित बेरोजगार, बिल्डर आणि उद्योजक अशा विविध घटकांना कर्ज धनादेशांचे वाटप करण्यात आले.



डॉ. सुजय विखे पा. यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना, ग्रामीण विकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव कातोरे समवेत दत्ता सप्रे, प्रविण कातोरे आदी. (छायाचित्र- एक्स्प्रेस फोटो, अहमदनगर)

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
✻ पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

## खरीप आढावा व रब्बी नियोजन बैठक संपन्न


# विद्यापीठ आत्मनिर्भरतेसाठी बीजोत्पादनाची मोठी मदत : कुलगुरू डॉ. शरद गडाख



**राहुरी । रयत समाचार**
महात्मा फुले कृषि विद्यापीठात खरीपहंगामातीलबीजोत्पादनाचा आढावा आणि रब्बी हंगामाचे नियोजन याबाबतची बैठक पार पडली. अतिवृष्टीमुळे बीजोत्पादन प्लॉट्सचे नुकसान झाले असले तरी खरीपचा ६६०० क्विंटल लक्षांकापैकी ४२५० क्विंटल उत्पादन साध्य करण्यात विद्यापीठाला यश आले. रब्बी हंगामातील बीजोत्पादनाचा ३८२० क्विंटल नियोजित लक्षांकही साध्य होईल, असा विश्वास कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी व्यक्त केला. बैठकीत संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले, डॉ. विजय शेलार आणि डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते. डॉ. दानवले यांनी प्रतिकूल हवामानातही लक्ष्याच्या तुलनेत समाधानकारक उत्पादन मिळाल्याचे सांगितले. केंद्रीय कृषि मंत्रालय व एफपीओंच्या ९२१ क्विंटलच्या लक्षांकाविरुद्ध विद्यापीठाने ४२५० क्विंटल उत्पादन नोंदवले. बैठकीत भाजीपाला, ऊस, फळझाडे, जैविक औषधे, खत उत्पादन आणि मायक्रोन्यूट्रिएंट्स संदर्भातील स्वतंत्र आढावे विविध तज्ज्ञांनी सादर केले. बैठकीचे सूत्रसंचालन व आभार डॉ. दिलीप गायकवाड यांनी मानले. बियाणे विभागाच्या अधिकारीकर्मचाऱ्यांनी बैठकीसाठी परिश्रम घेतले.

# ओंकार शुगर कर्मचाऱ्यांना २० टक्के पगारवाढ

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**
ओंकार शुगर ग्रुपमधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना २० टक्के वेतनवाढ देण्यात आल्याची माहिती ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी दिली.



यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, ''कर्मचारी हीच ओंकार शुगर ग्रुपची खरी ताकद असून त्यांच्या परिश्रमामुळेच ग्रुपने अल्पावधीत राज्यातील १८ साखर कारखान्यांचे पुनरुज्जीवन करून उत्पादन क्षमतेत मोठी वाढ साध्य केली आहे.'' ही वेतनवाढ ही त्यांच्या मेहनतीचे आणि योगदानाचे मूल्य मानून देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ओंकार ग्रुपमध्ये सध्या १६,५०० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. नव्या २०% पगारवाढीनंतर कर्मचारी वर्गाच्या आर्थिक स्थैर्यात वाढ होणार असून आगामी गाळप हंगामासाठी त्यांना प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास बोत्रे पाटील यांनी व्यक्त केला.

## गुरू तेगबहादूरजींच्या ३५० व्या शहादत गुरुपुरबनिमित्त

# गुरू अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान'च्या सेवा उपक्रमांना दाद

**अहमदनगर । रयत समाचार**
हिंद की चादर श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शहादत गुरुपुरब निमित्त गुरू अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानतर्फे राबविण्यात आलेल्या विविध मानवीय सेवा उपक्रमांना जिल्ह्यातील अनेक वृत्तपत्रांनी विशेष प्रसिद्धी दिली. 'घर-घर लंगर सेवा'या उपक्रमाच्या माध्यमातून प्रतिष्ठानने अहमदनगरसह आसपासच्या गावातील गोशाळांना भेट देत गुरुपुरबाच्या पावन पर्वावर गाई-म्हशींसाठी मोठ्या प्रमाणावर चाऱ्याचे वाटप केले.

पूरग्रस्तांसाठी दिलासा देत पंजाब आणि अहिल्यानगर जिल्ह्यात आलेल्या पूरस्थितीत प्रतिष्ठानच्या स्वयंसेवकांनी धाव घेत अनेक कुटुंबांना तातडीची जीवनावश्यक मदत पुरवली. पूरपरिस्थितीत दिलेल्या मदतीचे समाजातील विविध घटकांनी कौतुक केले असून प्रतिष्ठानने या कार्यात साथ दिलेल्या सर्वांचे मनापासून आभार मानले आहेत.

पुरवठा व मदत सामग्री (एकूण सेवा) : १५ टन जनावरांचे खाद्य, १०,००० ड्रेसचे वितरण, ४ गावांसाठी औषधांची उपलब्धता, २५० हून अधिक विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट्स, पंजाब व अहिल्यानगर पूरग्रस्त भागात इतर आवश्यक साहित्याचे वितरण केले.

स्वयंसेवक, दाते, समर्थक आणि शुभेच्छुकांच्या सहकार्यामुळे हे सर्व उपक्रम यशस्वी झाल्याचे प्रतिष्ठानने सांगितले. आपल्या आशीर्वाद आणि प्रेरणेने आम्ही मानवसेवेचा हा प्रवास अधिक दृढपणे पुढे नेत राहू, असे प्रतिष्ठानने म्हटले.

# अतिक्रमणधारकांचे विखेंकडून पुनर्वसन- फंड

**श्रीरामपूर । शफीक बागवान**
गेल्या निवडणुकीत आम्ही मनाचा मोठेपणा करून करण ससाणे यांना उपनगराध्यक्ष पद दिले; मात्र हे पद ते निट सांभाळू शकले नाही. फक्त ५ वर्ष उपनगराध्यक्ष म्हणून मिरवले, अशी टिका माजी नगराध्यक्ष संजय फंड यांनी केली. भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्रीनिवास बिहाणी यांच्यावर आरोप करणाऱ्यांना सडेतोड उत्तर देतांना फंड म्हणाले की, करण ससाणेंना पालिकेच्या सर्वसाधारण सभेत निट बोलता येत नव्हते. मुद्दे मांडता येत नव्हते. त्यांना उपनगराध्यक्ष पद देऊन काहीही उपयोग झाला नाही. आता करण ससाणे नगराध्यक्षपदाची स्वप्न पहात असून नगराध्यक्षपद हे मिरविण्यासाठी नाही तर जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी आहे. उपनगराध्यक्षपद जबाबदारीने सांभाळता आले नाही त्यामुळे नगराध्यक्ष पदाची जबाबदार ससाणे पेलू शकणार नाही. त्याच्यात ती गुणवत्ताच नाही अशी टीका त्यांनी केली.
फंड म्हणाले, शिवसेनेचे उमेदवार हे सुपारीबाज, सेटलमेंट करणारे असल्याचे सर्व श्रीरामपूरच्या जनतेला माहिती आहे. तेव्हा श्रीरामपूरचा रखडलेला विकास पूर्ण करण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली व मदतीने विकासाची नवी दिशा देण्यासाठी भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्रीनिवास बिहाणी यांना विजयी करणे हे श्रीरामपूरच्या जनतेने आता ठरवले आहे.

# प्रतिजेजुरीत चंपाषष्ठी उत्सवाचे आयोजन



**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**
संगमनेर तालुक्यातील प्रति जेजुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री क्षेत्र खंडोबा (देवगड) देवस्थान, हिवरगाव पावसा येथे चंपाषष्ठी उत्सवाचे आयोजन बुधवार, ता. २६ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. गावातील प्राचीन खंडोबा मंदिर असलेल्या देवगड येथे श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान आयोजित चंपाषष्ठी उत्सव२०२५ ची सुरुवात हर्षोल्हासात आणि चैतन्यपूर्ण वातावरणात होणार आहे.
श्री खंडोबा देवस्थानचा चंपाषष्ठी महोत्सव अनेक वर्षांपासून अखंडितपणे साजरा होत असून यंदाही भाविकांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.
उत्सवाचे वेळापत्रक ता. २६ नोव्हेंबर: पहाटे ५ ते ७ श्रींचे मंगलस्नान, ७ ते ७.३० काठीपालखी सजावट, ८ ते १० ग्रामदैवत हनुमान मंदिर दर्शन व पारंपरिक सवाद्य ग्रामप्रदक्षिणा मिरवणूक, १० ते ११ हळदी सोहळा, सायं ५ वाजता श्री खंडोबा यांचा लग्नसोहळा उत्साहात पार पडणार, सायं ५.३० वाजता महाआरती होणार आहे.
महोत्सव काळात दरवर्षी हजारो भाविक दर्शनासाठी येथे मोठ्या संख्येने येतात. यंदाही हा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हिवरगाव पावसा पंचक्रोशीतील नागरिक आणि खंडोबा भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सकाळी ११ वाजता महाप्रसादास सुरुवात होईल. या चंपाषष्ठी सोहळ्यास सर्व भाविक, भक्त आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री क्षेत्र खंडोबा (देवगड) देवस्थान ट्रस्ट आणि समस्त हिवरगाव पावसा ग्रामस्थ यांनी केले आहे.



माजी खा. सुजय विखे यांच्या वाढदिवसानिमित्त मुलगी मानवी हिने हस्तकलेतून रेखाटलेली मनमोहक प्रतिमा भेट देताना शनैश्वर देवस्थानच्या पहिल्या महिला विश्वस्त शालिनी लांडे व राजू लांडे.
(छाया विजय खंडागळे, सोनई)

# मुख्यमंत्र्यांच्या सभेनंतर संधान यांच्या समर्थनाला नवे पंख

## राजकीय पटावर मोठी चाल; पराग संधान यांच्या बाजूने समीकरणे फिरली

**कोपरगाव । किसन पवार**
कोपरगावात सोमवारी झालेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेला उसळलेल्या प्रचंड गर्दीने आणि निर्माण झालेल्या उत्साहाने शहरात नवचैतन्य निर्माण झाले आहे. या सभेनंतर मतदारांमध्ये कोपरगावच्या विकासाचे नवे चित्र आकार घेऊ लागले असून आगामी राजकीय समीकरणांवरही याचा थेट परिणाम दिसत आहे
या पार्श्वभूमीवर झालेली एक महत्त्वपूर्ण घडामोड म्हणजे अपक्ष उमेदवार दीपक वाजे यांनी युवानेते विवेक कोल्हे यांच्या उपस्थितीत भाजपामित्रपक्षांचे अधिकृत उमेदवार पराग संधान यांना जाहीर पाठिंबा जाहीर केला. या निर्णयामुळे कोपरगावच्या राजकीय रचनेत निर्णायक वळण आल्याची चर्चा सुरू आहे.



दरम्यान, प्रभाग क्रमांक चारमध्ये मोठी समंजस भूमिका घेत अतुल काले यांनी आपली उमेदवारी मागे घेत आकाश वाजे यांना भाजपामित्रपक्ष उमेदवार म्हणून मार्ग दिला आहे. शहरातील सर्व प्रभागांमध्ये प्रभावी जनसंपर्क असलेल्या काले यांच्या या निर्णयाने पक्षातील उत्साह वाढला आहे. अनुभवाचा फायदा सर्व प्रभागांना व्हावा आणि युवा नेतृत्वाला प्रोत्साहन मिळावे, या भावनेतून घेतलेल्या या निर्णयाचे युवानेते विवेक कोल्हे यांनी विशेष कौतुक केले.
पाठिंबा जाहीर करताना दीपक वाजे म्हणाले की, त्यांच्या प्रभागातील ६७० घरांच्या अतिक्रमण प्रकरणाचे पुनर्वसन हा त्यांचा मुख्य मुद्दा असून, २०१०११ मध्ये पाडण्यात आलेल्या या घरांच्या पुनर्वसनासाठी विवेक कोल्हे यांनी सातत्याने केलेला पाठपुरावा आणि मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभेत दिलेली स्पष्ट हमी लक्षात घेऊन ते पराग संधान यांच्या बाजूने उभे राहिले आहेत. ''गरिबांची घरे मार्गी लागावीत, हाच आमचा लढा आहे,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.
या घडामोडींचे स्वागत करत पराग संधान म्हणाले की, ''मनाचा मोठेपणा दाखवणाऱ्या वाजे कुटुंबाचे आणि पक्षासाठी महत्त्वपूर्ण भूमिका घेणाऱ्या अतुल काले यांचे आम्ही आभारी आहोत. सर्वांचे काम आपले समजून प्रामाणिकपणे पूर्ण करू,'' अशी ग्वाही त्यांनी दिली.

## किस्से निवडणुकीचे...

# मतदार शोधतांना उमेदवारांची होतेय दमछाक

**सलीमखान पठाण**




नगरपालिकेची निवडणूक जसजशी जवळ येत आहे तशा या निवडणुकीशी संबंधित अनेक बाबी उलगडत आहेत. पालिकेच्या प्रभागांची रचना अत्यंत सदोष आहे.प्रभागाच्या सीमा आखतांना कोणते निष्कर्ष लावले हे पालिकेच्या प्रशासनालाच माहित आहे. कारण प्रभागाच्या सीमा रेषा या कुठेही चौकोनात नाहीत. उलट दुसऱ्या प्रभागातील काही भाग नागमोडी वळणे घेऊन प्रभाग निर्माण करण्यात आले आहेत. एका प्रभागात असणारी नावे दुसऱ्या प्रभागात गेलेली आहेत आणि हे जवळपास सर्वच प्रभागांमध्ये घडले आहे. प्रशासनातील अधिकृत सूत्रांनी देखील ही गोष्ट मान्य केली आहे. मात्र असे कसे झाले या प्रश्नाला त्यांच्याकडे उत्तर नाही. प्रभागाची मतदार संख्या पाहता शेजारच्या प्रभागातील अनेक नावे ही दुसऱ्या प्रभागात आहेत. त्यामुळे मुख्य प्रभागातील उमेदवारांना दुसऱ्या भागात राहणाऱ्या आपल्या मतदारांना संपर्क करणे अवघड जात आहे. निवडणुकीत काही माजी नगरसेवक असले तरी सुद्धा त्यांचा पूर्वीचा भाग आणि आत्ताचा त्यांच्या प्रभागात समाविष्ट झालेला नवीन भाग यामध्ये संपर्काच्या अडचणी आहेत. काहींनी आपल्या प्रभागात भरपूर कामे केली. पण दुर्दैवाने त्यांचा भाग तोडला जाऊन दुसऱ्या प्रभागाला मिळाला. त्यामुळे हक्काचे मतदार दुरावले तर नवीन प्रभागामध्ये संपर्क करताना नवीन मतदारांशी जुळवून घेणे अवघड जात आहे.

मतदार यादीच्या आधारे मतदारांचा शोध घेतला जात आहे तसेच त्यांना संपर्क करण्यासाठी उमेदवार व त्यांचे जवळचे कार्यकर्ते आणि नातेवाईक यांची मोठी धावपळ होत आहे.सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे इतर प्रभागातील मतदारांना आपल्या प्रभागातील मतदान केंद्रांवर मतदान करण्यासाठी उमेदवारांना नियोजन करावे लागणार आहे. त्यासाठी आता दुसऱ्या प्रभागातील जी नावे मतदारसंघात आलेली आहेत, तेथील मतदारांशी संपर्क वाढविण्यावर सर्वच उमेदवार भर देत आहेत. प्रभाग सात मधील साडेचारशे पेक्षा अधिक नावे प्रभाग आठ मध्ये समाविष्ट झाली आहेत. प्रभाग आठ हा शहरातील सर्वात मोठा ६१३२ मतदारांचा प्रभाग आहे. यामध्ये प्रभाग सातमधील समाविष्ट झालेली नावे ही प्रभाग आठ चा निकाल बदलू शकतात अशी चर्चा आहे.

# आव्हाडांच्या डोक्यावरची टांगती तलवार हटताच, भाजपाच्या गोटात संचारले चैतन्य

**राजेंद्र देवढे**
९८२२७४७३२०
**राज की बात**

पाथर्डी नगरपरिषदेच्या निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अभय आव्हाड यांच्या उमेदवारी अर्जावर, महाविकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बंडू पाटील बोरुडे यांनी हरकत घेतल्याने आव्हाडांच्या उमेदवारीबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी बोरुडे यांची हरकत फेटाळल्याने त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. परंतु, न्यायालयानेही आव्हाड यांच्या बाजूने कौल दिल्याने त्यांच्या उमेदवारीवरची टांगती तलवार हटली आहे. दरम्यान, भाजपाच्या प्रचार यंत्रणेत आलेली मरगळ झटकली गेल्याने भाजपाच्या गोटात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

अभय आव्हाड यांच्या उमेदवारीवरचे मळभ हटल्याने आता निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले असून, ही लढत तिरंगी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानुसार भाजपाच्या वतीने अभय आव्हाड, महाविकास आघाडीच्या वतीने बंडू पाटील बोरुडे व राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाच्या वतीने संजय भागवत यांच्यात नगराध्यक्ष पदासाठी थेट जनतेतून मतदान होणार आहे. अभय आव्हाड यांच्या उमेदवारीच्या अनिश्चिततेमुळे सुरू झालेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असल्याने, पाथर्डी शहरातील मतदार येत्या आठवड्यात काय निर्णय घेणार, याविषयीची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. नगराध्यक्ष पदासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले तीनही उमेदवार सक्षम असले तरी जाती-धर्माचा फॅक्टर निर्णायक ठरणार आहे. कारण, तिन्ही उमेदवार वेगवेगळ्या जातीचे असल्याने प्रत्येकाची जात कुणामागे ठामपणे उभी राहते, यावर या निवडणुकीचा निकाल अवलंबून आहे. पाथर्डी नगर परिषदेसाठी सर्वाधिक मतदार मराठा समाजाचे आहेत. त्यानंतर विणकर म्हणजेच कोष्टी समाजाच्या मतदारांची संख्या आहे. त्यापाठोपाठ वंजारी समाजाचे मतदार आहेत. माळी व मुस्लीम समाजाचे मतदारही मोठ्या प्रमाणात असल्याने, ते कुणाची पाठराखण करतात यावर या निवडणुकीचा निकाल अवलंबून आहे. यापैकी, मराठा समाजाच्या मतदारांची



संख्या मोठी असली तरी आमदार मोनिका राजळे यांचं समर्थन करणारा अल्पसंख्यांक मराठा मतदार कुणाच्या पारड्यात मतदान टाकणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. परळी मतदार संघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेवर झालेले दुग्धाभिषेक आंदोलन व त्यावेळी उधळलेल्या मुक्ताफळांनी ढवळून निघालेले वातावरण सध्या शांत झाले असले तरी झालेल्या जखमांवरची खपली उचकटण्याची शक्यता नाकारता येणार नाही. यासाठी आमदार मोनिका राजळे यांची भूमिका निर्णायक ठरणार असली तरी ही निवडणूक त्यांची नाही.



पाथर्डी नगर परिषदेची होऊ घातलेली निवडणूक दिवसेंदिवस जसजशी तापत जाईल तसतशी मतदारांची मानसिकता स्पष्ट होत जाईल. नुकत्याच झालेल्या जिल्हा सहकारी बँकेच्या चेअरमन पदाच्या निवडीचे पदरही निर्णायक ठरणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात नेहमी सोयऱ्याधायऱ्यांच्या गोटातील हालचाली निर्णायक ठरल्या आहेत. माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांना गेल्यावेळी आमदार मोनिका राजळे यांनी तोंडावर पाडले होते. परंतु, यावेळी घुले पाटील यांनी अजीत पवार गटाशी जवळीक साधल्याने



त्यांचा विजय सुकर झाला. विखे पाटील पिता-पुत्रांनीही हीच संवेदनशील नस पकडून घुले पाटील यांना सहकार्य केले आहे. त्याचाही परिणाम या निवडणुकीत पहावयास मिळणार आहे.
घुले पाटील चमडी बचाव धोरण अवलंबणार की अजीत पवार गटासाठी योगदान देणार हे नजीकच्या भविष्यात स्पष्ट होईलच...! कारण, ते आव्हाड, बोरुडे भागवत या सर्वांचेच अवसानघातकी मित्र आहेत. तुर्तास ते कोणती भूमिका वठवतात यावर होऊ घातलेल्या नगर परिषदेच्या निवडणुकीचे चित्र अवलंबून असेल.

# संविधान : भारताचा प्राण

आज २६ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७६ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७६ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांना एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून; आमच्या संविधानसभेत आज ता. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत.

ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा.

२६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता, राजकुमारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला.

संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठ्या उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते.

# न्यू आर्टस् महाविद्यालयाला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत रौप्यपदक

# एडके, गोरडे, देसाई यांची महाराष्ट्र संघात निवड

अहमदनगर । रयत समाचार

न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी राज्यस्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. १९ वर्ष वयोगटातील मुलांच्या गटात या संघाने नाशिक विभाग आणि छत्रपती संभाजीनगर विभागाचा पराभव करून अंतिम फेरीत दमदार प्रवेश मिळवला. फायनलमध्ये अमरावती विभागाविरोधात झालेला सामना अत्यंत चुरशीचा झाला. उत्कृष्ट खेळ करूनही न्यू आर्टस् कनिष्ठ महाविद्यालयाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेत सागर एडके, शिवम गोरडे आणि सुमित देसाई या तिघांची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली असून त्यांच्या



कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. वाशिम येथे १८ ते २० नोव्हेंबरदरम्यान ही राज्यस्तरीय स्पर्धा पार पडली.

संघामध्ये कर्णधार यश साळवे, सागर एडके, सार्थक शिंदे, शिवम गोरडे, साद कागदी, सुमित देसाई, महेंद्र परदेशी, कृष्णा काळे, गणेश ब्राह्मणे, शिवप्रताप शिंदे, यश कर्डिले आणि रोहित गायकवाड या खेळाडूंचा समावेश होता.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, सर्व विश्वस्त, कार्यकारिणी सदस्य, संचालक डॉ. भास्कराव झावरे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, प्रबंधक बबन साबळे आणि उपप्राचार्य व कर्मचारी यांनी संघाचे अभिनंदन केले.

प्रो कबड्डी लीगमुळे कबड्डी खेळाची लोकप्रियता वाढत असून स्पर्धा अधिक तीव्र होत आहेत. अशा परिस्थितीत न्यू आर्टस् कनिष्ठ महाविद्यालयाच्या संघाने जिल्हास्तरापासून राज्यस्तरापर्यंत सातत्यपूर्ण दमदार कामगिरी करत सर्व सामने १५ ते २० गुणांच्या फरकाने जिंकत राज्यस्तरापर्यंत मजल मारली. विजेत्या आणि उपविजेत्या संघांना प्रमाणपत्र व भव्य ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत सागर एडके याला 'बेस्ट रेडर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संघाला क्रिडाशिक्षक प्रा. सुधाकर सुंबे आणि प्रा. आकाश नढे यांचे मार्गदर्शन लाभले.

## बिबट हल्ल्यात जखमींना उपचारासोबत आर्थिक मदत द्या- श्रीकांत भालेराव



**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

हिवरगाव पावसा येथील टेमगिरे वस्तीवरील अर्चना संदीप टेमगिरे या महिलेला काही दिवसांपूर्वी बिबट्याने अचानक हल्ला केला होता. धाडसाने सामना करत अर्चना टेमगिरे यांनी बिबट्याशी चिवट झुंज देत त्याचा हल्ला परतवून लावला. दोन ते तीन वेळा बिबट्याला हाताने दूर ढकलून त्यांनी स्वतःचा बचाव केला. वालवडीच्या शेतातील तारांमुळे बिबट्याचा प्रतिकार कमी पडला आणि त्या स्वतःला वाचवण्यात यशस्वी ठरल्या. तथापि या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्याने त्यांच्यावर कुटे हॉस्पिटल येथे अनेक दिवस उपचार सुरू होते. घटनेची माहिती मिळताच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे श्रीकांत भालेराव यांनी टेमगिरे वस्तीला भेट देत जखमी अर्चना टेमगिरे यांच्या तब्येतीची विचारपूस केली व कुटुंबियांना धीर दिला.

यावेळी भालेराव म्हणाले की, ''वनविभागाने औषधोपचाराचा खर्च केलेला असला तरी त्या मानसिकदृष्ट्या अजूनही हादरलेल्या आहेत. पुढील अनेक दिवस औषधोपचार आवश्यक असल्याने गंभीर जखमी व्यक्तींना वैद्यकीय उपचारासोबत आर्थिक मदत देणे अत्यावश्यक आहे.'' याप्रकरणी त्यांनी महाराष्ट्र शासन, वन विभाग तसेच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडे तात्काळ आर्थिक मदतीची मागणी केली आहे. या भेटीप्रसंगी कला सम्राज्ञी पवळा कला मंचाचे सचिव नितीनचंद्र भालेराव, बाळासाहेब टेमगिरे, संदीप टेमगिरे यांच्यासह स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

## विश्वासनाम्याने मी प्रभावित- मुख्यमंत्री फडणवीस

### कोल्हे-विखे संवादाने रंगत

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव शहरातील निवडणूक रणधुमाळीत भाजपआरपीआयमित्रपक्ष, लोकसेवा आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराला मोठी गती मिळाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर सोमवारी झालेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहीर सभेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठी उपस्थिती लावली. सभेत बोलताना फडणवीस म्हणाले की, युवानेते विवेक कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या विश्वासनाम्याने ते प्रभावित झाले असून, ''हा विश्वासनामा कोपरगावच्या विकासाचा मजबूत पाया आहे. याची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारकडून सर्वतोपरी सहकार्य देणार आहोत. पराग संधान आणि सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमत द्या,'' असे आवाहन त्यांनी केले. फडणवीस यांच्या या भूमिकेमुळे आघाडीच्या प्रचारात नवी उर्जा भरल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. सभेत माजी आमदार स्नेहलता



कोल्हे यांनी भाषणात विरोधी उमेदवारांवर टीका करत ''ही माणसे दलबदलू आहेत. विरोधी उमेदवार पठाणी वसुली करणारे असून त्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत,'' असे वक्तव्य केले. त्यांच्या या टीकेनंतर सभेत क्षणभर कुजबुज सुरू झाली. सभेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री गिरीश महाजन, आमदार विक्रम पाचपुते, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, विवेक कोल्हे, नितीन दिनकर, रवींद्र बोरावके, पराग संधान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद आणि महिलांची मोठी उपस्थिती यामुळे सभेची रंगत अधिक वाढली. संपूर्ण सभेत विकासाची ग्वाही दिली गेली. निवडणुकीत आता थेट टक्कर निश्चित झाली असून, कोपरगावचे राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत.

> निवडणूक स्वच्छ मनाने लढली पाहिजे. मला 'आका' म्हणा किंवा 'बोका' म्हणा, काही फरक पडत नाही. पण माझ्या मनात आलं तर काहीही होऊ शकतं. वक्तव्याला मर्यादा असतात. भाचीकडून बोललं जातं, तरीही मामा शांत आहे. संयम हरवला तर परिणाम वेगळे दिसतील,
>
> **- राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**

# निवडणुका थांबू नयेत

## फडणवीसांची सर्वोच्च न्यायालयात विनंती

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील नगरपालिकांच्या निवडणुका सुरू असून प्रचाराचा जोर वाढला आहे. सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणाबाबत सुनावणी सुरू असल्याने निवडणूक प्रक्रियेवर टांगती तलवार असल्याचे वातावरण आहे. आज झालेल्या सुनावणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देताना निवडणूक प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडावी अशी विनंती न्यायालयाकडे केली असल्याचे सांगितले. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे. मतदानाला फक्त काही दिवस उरले असून ही प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण व्हावी, ही आमची मागणी सर्वोच्च न्यायालय मान्य करेल, अशी अपेक्षा आहे,'' असे मुख्यमंत्री म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेबाबत सकारात्मक मत व्यक्त केले असून आधीच्या निर्णयाचे पुनरावलोकन करण्याची गरज असल्याची टिप्पणी केली आहे. फडणवीस म्हणाले की, ''या निर्णयामुळे आम्हाला आशा वाटते की निवडणुका कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडतील. मात्र अंतिम निर्णय न्यायालयाचा असेल, त्यामुळे यावर जास्त भाष्य करणं योग्य नाही.'' फडणवीस यांनी माजी सरकारवर टीका करताना सांगितले की, ''राज्यात उद्धव ठाकरे यांच्या सरकारच्या काळात आरक्षणाचे नुकसान झाले. आम्ही कोर्टात जाऊन मागणी केली की संपूर्ण माहिती मिळाल्यानंतरच आरक्षणासहित निवडणुका घ्याव्यात. त्यानंतरच ही प्रक्रिया पुढे सुरु झाली.'' दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेत काही नगरपरिषदांमध्ये आरक्षणाचा टक्का घटनात्मक ५० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पुढील सुनावणी २८ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

### विद्यार्थ्यांचा जिद्द, कष्ट आणि सातत्याचा विजय

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयातील ३१ विद्यार्थी सैन्यदलात



**पाथर्डी । नितीन गटाणी**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या तब्बल ३१ विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात निवड होऊन महाविद्यालयाने अभिमानास्पद यशाची नोंद केली आहे. अत्यंत कठीण परिस्थितीत राहूनही विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास, क्रीडांगणावर सराव आणि कठोर मेहनतीच्या जोरावर स्वप्न साकार केले. विशेष म्हणजे सैन्यदलात निवड झालेले सर्व विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आणि सामान्य कुटुंबातील आहेत.

यावर्षी भारतीय लष्कराने अग्निवीर भरती प्रक्रिया जाहीर केली होती. भरतीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत ३१ जणांनी सैन्यदलात भरती होण्याचा मान मिळविला. महाराष्ट्रातील एखाद्या महाविद्यालयातून इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थी सैन्यात जाण्याचा हा दुर्मिळ आणि लक्षणीय उच्चांक आहे. ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शिक्षण आणि नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या दूरदृष्टीने मा. आ. स्व. बाबुजी आव्हाड यांनी हे महाविद्यालय स्थापन केले. गेल्या १४ वर्षांत ग्रंथालय, करिअर कट्टा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि भव्य क्रीडांगणाच्या सुविधांचा उपयोग करून २३४३ विद्यार्थी विविध शासकीय सेवेत भरती झाले आहेत. दिवसभर अभ्यासिकेत अभ्यास, प्रश्नसंचांचा सराव आणि क्रीडांगणावरील शारीरिक सराव यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले. सैन्यदलात भरती झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी मार्गदर्शन करताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला. ''अशा प्रतिकूल परिस्थितीतही मिळवलेले हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे,'' असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या डॉ. किरण गुलदगड (करिअर कट्टा समन्वयक), डॉ. विजय देशमुख (शारीरिक शिक्षण संचालक), तसेच एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन डॉ. अजय पालवे यांच्या योगदानाचे विशेष कौतुक करण्यात आले. सत्कार कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. किरण गुलदगड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शरद बोडखे यांनी तर आभार प्रा. सचिन पालवे यांनी मानले.

## मोहटा देवस्थान नूतन विश्वस्त मंडळाने स्वीकारला पदभार



पाथर्डी । नितीन गटाणी

श्री क्षेत्र जगदंबा देवी (मोहटा) देवस्थानाच्या नूतन १० सदस्यीय विश्वस्त मंडळाची निवड अहिल्यानगर जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी जाहीर केली असून, निवड झालेल्या सर्व विश्वस्तांनी आज मोहटा गडावर विधिवत पूजन करून पदभार स्वीकारला.

मागील विश्वस्त मंडळाची मुदत ता. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी संपल्याने २५ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री मोहटादेवी देवस्थानचे चेअरमन तथा जिल्हा न्यायाधीश४ महेश लोणे आणि दिवाणी न्यायाधीश रविकिरण सपाटे यांच्या उपस्थितीत नवीन विश्वस्त मंडळाने पदभार स्वीकारण्याची प्रक्रिया पार पडली.

गाव प्रतिनिधीतून निवडलेले विश्वस्त: बाबासाहेब रघुनाथ दहिफळे, शुभम शामराव दहिफळे, शशिकांत रामनाथ दहिफळे, अशोक भगवान दहिफळे, राजेंद्र विठ्ठल शिंदे, भावीकांमधून निवडलेले विश्वस्त: ॲड. विक्रम लक्ष्मणराव वाडेकर, ॲड. कल्याण दगडू बडे, ॲड. प्रसन्न साहेबराव दराडे, श्रीकांत शिवकरण लाहोटी, ॲड. ऋतीका अशोक कराळे यांनी पदभार स्वीकारला.

देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी विश्वस्तांचे स्वागत करत देवस्थानतर्फे सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदिप घुले आणि कर्मचारी उपस्थित होते.नवीन विश्वस्त मंडळाने आगामी काळात भावीक भक्तांसाठी अधिक सुविधा निर्माण करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचे आश्वासन दिले.